पहाणारे महाराज असे थोडेच चकणार. लक्ष्मणरावांनीं पाळण्याला हात लावला मात्र तों महाराजांनीं तिकडे नजर केली व मारण्याचा आविर्भाव आणून "बांधलेला कशाला सोडतो" म्हणून त्याच्या अंगावर ओरडले. अर्थात पाळणा सोडणें तितकेंच राहिले व लक्ष्मणराव बाजूला झाले. कांहीं वेळानें महाराजांनीं आपले नेहमींचें सौम्य स्वरूप धरून ते वृत्तीवर आले. व नंतर महापूजा आरती वगैरे होऊन सर्व समारंभ पार पडला. परंतु उत्सव येथेंच संपला मात्र नाहीं. त्याची सांगता होणें राहिली होती तीही अन्य रीतीनें महाराजांनींच सुचविली. जन्म झाला, पुढे उरुसाच्या मंडळीची गर्दी होईल व माझ्या देवाचा पाळणा खराब होईल तेव्हां तो सोडून आण म्हणून राधाकृष्ण आईनें लक्ष्मणरावाला सांगितले. महाराजांनीं पूर्वी पाळणा सोडण्याला प्रतिबंध केला असल्यामुळें तो सोडण्यास त्यांचीं आज्ञा घेणें जरूर होतें. म्हणून तिसरे प्रहरीं लक्ष्मणरावानं पाळणा सोडण्याची परवानगी मागितली तेव्हा महाराज म्हणाले इतक्यांत सोडावयाचा नाहीं अजून काय कोठे संपले आहे ? लक्ष्मणरावानीं ही हकीगत राधाकृष्ण आईला सांगितली. त्यांनीं थोडा विचार करून प्रफुल्लित मुद्रेनें लगेच सांगितलें, "वेड्या, मालकाच्या ( राधाकृष्ण आई महाराजांना मालक म्हणत असत ) मुखांतून वायफळ शब्द कधीं निघेल ? तुम्हीं उत्सव सुरू केलात त्याची सांगता दुसरे दिवशीं गोपाळकाला केल्याशिवाय होत नाहीं. उद्या गोपाळ काला करा व मग पाळणा सोडा." ही हकीगत भीष्म बोवांना सांगितली. त्यांनीं कीर्तन करण्याचें कबूल केलें, काल्याला लाह्या पाहिजेत, त्या शिरडींत मिळेनात, लाह्या राहत्याहून आणविल्या. दुसरे दिवशीं दहीहंडी तयार करून वाजत गाजत सभामंडपांत आणली व महाराजांची परवानगी घेऊन ती तेथें टांगली. कीर्तन होऊन दहीहंडी फुटली व उत्सवाची सांगता झाली. नंतर पाळणा सोडण्याची परवानगी मागतांच महाराजांनीं ती दिली. जन्मोत्सवाचे हे सोहळे चालू असतां वार्षिक निशाणांची मिरवणूक, रात्रीं संदलीची मिरवणूक या दोन्हींही थाटानें झाल्या. या वर्षापासून उरुसाचें रूपांतर रामजन्माच्या उत्सवांत झालें व

तेव्हांपासून 'बावांचा उरुस' या नांवाचा लय होऊन, हा उत्सवाला 'रामजन्माचा उत्सव हें नांव मिळालें. अद्याप तेच चालू आहे.

ह्याप्रमाणे उत्सव समाप्ति झाल्यावर आलेली मंडळी महाराजांची परवानगी घेऊन जाऊं लागली. ज्यांना जाणें आवश्यक असेल अशाच मंडळींना महाराज परवानगी देत असत. इतरांना हनुमान जयंती पर्यंत ठेऊन घेत असत. गांवच्या देवळांकडेही महाराजाचें लक्ष असे. गांवच्या मारुतीच्या देवळाचा जीर्णोद्धार महाराजांनींच करविला व देऊळ मोठेंही करविलें. ह्या देऊळांत गांवकरी हनुमान जयंती करवीत असतात. हनुमान जयंतीच्या पूर्वरात्रीं ही एक महत्वाची कामगिरी असे. उरुसाकरितां आलेलीं दुकानें मारुतीच्या देवळाचे आसपास व समोरपर्यंत पसरत असत. दुकानें उठून गेल्यावर चोहींकडे घाण पडलेली असे. ती सर्व साफ करण्याचें काम राधाकृष्ण आई आपल्या मंडळींना घेऊन करीत असत. या कामाला रात्रीं ४।५ तास लागत. सकाळला सर्व जागा, पटांगण साफ करून झाडून स्वच्छ होत असे. सकाळीं हनुमान जयंती झाल्यावर बहुतेक सर्व मंडळी महाराजांची परवानगी घेऊन रवाना होत असत.

येथपर्यंत उरुसाचें पर्यवसान रामजन्मोत्सवांत कसें झालें व सुरवातीला त्याचें स्वरूप काय होतें त्याचें आम्हीं दिग्दर्शन केलें. पुढाकडील उत्सवाची कांहीं अंगे वाढलीं. राधाकृष्ण आईनीं वर्षप्रतिपदेपासून नऊ दिवस सभामंडपांत नामसप्ता उभा केला. या नऊ दिवसांत तंबोरी मुळींच खालीं ठेवली जात नसे. अहोरात्र भजन चालू असे. पुरेशी मंडळी गोळा करून त्यांना पहारे वांटून दिले होते. सर्वांची भोजनाची व्यवस्था केली होती. महाराज चावडींत असत त्या रात्रीं पहाटेस राधा कृष्ण आई स्वतः एक पहारा संभाळून सुंदर आवाजांत प्रेमळ भजन करीत असत. या वर्षील भीष्मबुवा तेथें नव्हते म्हणून मुंबईहून हरिदास आणण्याबद्दल राधाकृष्ण आईनीं लक्ष्मणरावाला कळविलें. रामजन्माचा उत्सव सर्वत्र असल्यामुळें शिरडीस नेण्यास लक्ष्मणरावांना कीर्तनकार कोणी मिळेना. ज्यांना विचारावें ते म्हणत आमची वार्षिक नेमणूक अमके ठिकाणीं आहे. त्यांच्या ओळखीचे

एक प्रसिद्ध ब्राह्मण गवई असत व ते शोकाखातर कीर्तनही करीत असत. त्यांना विचारतां त्यांनीं पण आपण ठाण्यास रामनवमीकरितां दरवर्षी गुंत-लेलों आहोंत म्हणून सांगितले. कीर्तनकार न मिळाल्यामुळे त्याचा व राधाकृष्ण आईचा बराच विरस झाला. हा सुरू झालेला उत्साव बंद पडूं द्यावयाचा नाहीं ही त्यांची उत्कट इच्छा. शेवटीं कोणी मिळत नाहीं तेव्हां स्वतःच कीर्तन करून दुधाची तहान ताकावर भागवावी असें त्यांनीं टरविलें व त्याप्रमाणें दास गणूकृत राम जन्माचे आख्यान पाठ करण्यास त्यांनीं सुरुवात केली. आपल्या हातून कीर्तन कसें निभेल याची त्यांना फार काळजी वाटत होती. परंतु ही त्यांची तळमळ फुकट होती. महाराजांनींच उत्सव सुरू केला व त्याची काळजी त्यांना होतीच. महाराजांची नेहमींची पद्धत स्वतः प्रत्यक्ष कांहीं न करितां योजिलेला कार्यभाग कोणा-कडून तरी करवून घ्यावयाचा. त्याप्रमाणे रामनवमी पूर्वी ४।६ च दिवस अर्वाचीन तुकाराम महाराज म्हणून प्रसिद्धीस आलेल्या ह. भ. प. बाळाबुवांची व लक्ष्मणरावची अवचित भेट झाली. बाळाबुवाची कीर्तनपद्धति भजनी असे. त्यांचीं कीर्तनें प्रासादिक असत. हे बुवा जर आपल्याला लाभले तर फार बहार होईल असें वाटून लक्ष्मणरावानीं त्यांना शिरडीस चलण्याबद्दल विनंती केली व त्यांनीही रुकार दिला. त्यांना त्यांच्या मंडळीसह लक्ष्मणराव शिरडीस घेऊन आले. व जन्मोत्सव त्यांचे हातून पार पाडला.

तिसरे वर्षी कीर्तनकाराची अडचण पडली नाहीं. ते आपण होऊ-नच चालून आले. त्यांचे नांव बाळाबुवा सातारकर. हे अलीकडे बरेच वर्षें मुंबईस असतात. पूर्वीच्या वर्षी यांनाही लक्ष्मणरावांनीं विचारलें होतें, परंतु बिऱ्हाड सिद्धकवठें म्हणून सातार जिल्ह्यांत एक गांव आहे तेथील रामनव-मीचें वर्षासन आपणास आहे असें त्यांनीं सांगितलें होतें या वर्षी त्या गांवीं प्लेग असल्यामुळें तेथील उत्सव बंद होता. तेव्हां शिरडीस जाण्यास ही संधी चांगली आहे असें वाटून त्यांनीं काकासाहेब दीक्षितांची पार्ल्यास त्यांचे बंगल्यांत भेट घेतली. कोणतेंही काम महाराजांच्या परवानगी शिवाय करावयाचें नाहीं, हा काकासाहेबांचा नेहमींचा नियम. म्हणून शिरडीस गेल्या-

वर आपण महाराजांना विचारूं व त्यांची आज्ञा झाल्यास पत्र पाठवूं असे आश्वासन काकासाहेबांनीं त्यांना दिलें. जाणें झाल्यास वाटखर्चाची सोय लाविली जाईल परंतु बिदागी मात्र महाराजांच्या आज्ञेवर अवलंबून राहील असे सांगितलें. बोवा मोकळे होते व त्यांना महाराजांचे दर्शन घ्यावयाचे होतें म्हणून त्यांनी ते कबूल केलें. इतके बोलणें होतें तों लक्ष्मणराव तेथे आले. त्या सकाळींच ते शिरडीहून आले होते. त्यांनीं येऊन सर्वांना उदी व प्रसाद दिला. बाळाबुवाना तोच शुभ शकून वाटून रामनवमीला शिरडीस खास जाणे होणार अशी त्यांनीं गांठ बांधली. व त्याप्रमाणे महाराजांची परवानगी मिळून त्यांचे जाणेही झालें. या बुवांनीं ९ दिवस कीर्तनें केलीं व राम जन्माचा सर्व सोहोळा उरकला. महाराजांनीं त्यांना बिदागीही चांगली देवविली.

या उत्सवाला एका कीर्तनकाराशिवाय परावलंबीपणा कांहीं नव्हता तीही अडचण चवथे वर्षी महाराजांनीं दूर केली सर्व इतर सामग्री जशी घरची होती तसे कीर्तनकारही घरचे होते. ह. भ. प. दासगणु, हे महाराजांचे परम भक्त. महाराजांचे आज्ञेने यांनीं आपला मूळ पेषा सोडून त्यांच्या आशिर्वादानें हे उत्तम कवि व कीर्तनकार झाले. रामनवमीचे कीर्तन जर त्यांनीं पत्करलें तर सर्व चिंता दूर होणार होती. परंतु महाराजांनीं आज्ञा केल्यास हा योग जमण्यासारखा होता. पुढें एके दिवशीं दासगणु शिरडीस आले असतां लक्ष्मणरावही तेथे होते. त्यांनीं योग्य संधी साधून तत्संबंधीं महाराजांना विनंती केली. त्याप्रमाणे महाराजांनीं दासगणूंना दरवर्षी येऊन रामनवमीचा उत्सव साजरा करीत जावा म्हणून सांगितले दासगणूंनीही गुरूआज्ञा प्रमाण मानून आजपर्यंत तो क्रम चालविला आहे.

१९१२ सालीं हा रामजन्माचा उत्सव सुरूं झाला, तेव्हां त्याचें स्वरूप कसें होतें त्याची रूपरेखा आम्हीं वर दर्शविलीच आहे. त्यानंतर प्रतिवर्षी उत्सवाची एकेक कला वाढतच चालली. वर्ष प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत उत्सव होऊं लागला. ८ मी पासून १२ पर्यंत तर शिरडी सारखी गजबजलेली राहत असे. दुकानें जास्ती येऊं लागलीं.

मंडळींचा जमाव वाढत चालला. कुस्तीच्या आखाड्यात हजरत्वाचे प्रसिद्ध मल्ल येऊं लागले. एक सर्कस प्रतिवर्षी येऊं लागली. अन्न संतर्पण मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें. दुसरीकडे एकट्या राधाकृष्ण आईच्या खटपटीमुळें शिरडीला संस्थानचें स्वरूप येऊं लागले.* संस्थानचा सरंजाम वाढत चालला. एका भक्ताने एक सुंदर घोडा नजर केला. कांहीं भक्तांनीं पालखी पाठविली, कांहींनीं रथ पाठविला. कांहींनीं चादीचे गंगाळ, घागर, समया व इतर लहान मोठीं चांदीचीं भांडीं पाठविलीं गजनोच्या, भर जरीच्या, मखमालीच्या गाद्या तक्के उशा आल्या. मौल्यवान् शेले व इतर वस्त्रे येऊं लागलीं. सभामंडप, तसबिरी, आरशे व हंड्या झुंबरानीं सुशोभित झाला. जरी संस्थानचा सरंजाम इतका वाढला तरी मौजेची गोष्ट ही कीं महाराजांनीं आपला साधेपणा सोडला नाहीं व या वस्तूंचा प्रत्यक्ष स्वीकार केला नाहीं. नाहीं म्हणावयाला कांहीं विविक्षित कारणामुळें (ही हकीगत पुढे येईल) पोत्यावर बसण्याचें सोडून महाराजांनीं बसण्याकरितां गादीचा मात्र स्वीकार केला. या सरंजामाचा उपयोग मिरवणूकीच्या शोभेकडे मात्र होऊं लागला. निशाणांची व संदलीची मिरवणूक फार थाटाने होऊं लागली. या मिरवणूकीना शोभे करितां सर्कसवाले आपला हत्ती पाठवीत असत. हत्ती संस्थानच्या मालकीचा असावा असें महाराजांच्या कांहीं भक्तांच्या मनांत आलें व महाराजांनीं परवानगी दिल्यास पडेल ती किंमत देऊन सर्कसचा हत्ती विकत घेण्याचें ठरवून ही मंडळी महाराजाची परवानगी घेण्यास गेली, व थोडासा हट्टही घेऊन बसली. पण महाराज थोडीच परवानगी देणार? त्यांनीं जसा एखादा प्रेमळ पिता, आपल्या अज्ञान अर्भकांची समजूत घालतो त्याप्रमाणें त्यांची समजूत घातली. 'हत्ती घेणे कठीण नाहीं परंतु त्याला पोसायचे कसें? तो खंडीभर खायला मागणार, आपण फकीरी माणसें. उगाच हा व्याप हवा कशाला? शोभेला आपल्याला हत्ती आयता मिळतो व आपलें काम होतें. मग स्वतःचाच घेण्यांत काय जास्ती आहे? अशा युक्तिवादानें महाराजानीं त्या मंडळीची समजूत घातली व दरवर्षी हत्ती येईल

* यासंबंधीची मनोवेधक हकीगत आम्ही स्वतंत्र लेखांत देणार आहोंत.

असा आशिर्वाद दिला आणि त्याप्रमाणें येत ही होता. या उत्सवांस हिंदू व मुसलमान एक जुटीनें काम करीत असत. रामजन्माचा उत्सव हिंदूचा म्हणून तेथें मुसलमानांनी येऊं नये असा परका भाव हिंदूचे मनांत आला नाहीं; किंवा मशिदींत हिंदूंचा उत्सव होतो त्याचा मुसलमानांना कधीं विषाद वाटला नाहीं, मुसलमान जन्मोत्सवांत सामील होत असत व हिंदू त्यांच्या संदलं बरोबर जात असत. जातीभेद विसरून, दोघांच्या चित्तवृत्ति महाराजांत लीन होत असत. समाज फार वाढत चालल्यामुळे पुढे पोलीसपार्टी आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यासह, न जाणों कांहीं दंगा फिसाद होईल म्हणून बंदोबस्ताकरितां येऊं लागली, परंतु महाराजांच्या कृपेनें त्या पार्टीचा मिरवणूकीच्या शोभेंत भर टाकण्यापलीकडे कांहीं उपयोग झाला नाहीं. ज्या उरसाला पूर्वी ५।७ हजार माणूस जमत असे तेथें शेवटीं शेवटीं यात्रा पाऊण लाखापर्यंत गेली. परंतु कधीं रोगराई झाली नाहीं कीं दंगा झाला नाहीं.

वर आम्हीं म्हटलेंच आहे कीं महाराजांनीं समाधि घेतल्यावर उत्सवाची जी व्यवस्था झाली त्यांत हा रामजन्माचा उत्सव ह भ. प. दासगणु महाराज व तात्या पाटील यांचेकडे सोपविण्यांत आला. नुकतेच दासगणु महाराजांचे प्रेमळ शिष्य रा. दामु अण्णा कैलासवासी झाल्यामुळें यंदा उत्सवांत कांहीं फेरफार करावा लागणार कीं काय म्हणून भक्त मंडळींना थोडीशी काळजी वाटत होती. परंतु दासगणु महाराजांनीं मोठें आत्मसंयमन करून आपल्या गुरूसेवेंत अंतर पडूं दिलें नाहीं. दामु अण्णाची जागा किसनरावकडून भरून काढली. त्यांचेबरोबर मोगलाईतून श्रीमंत राजेश्वरराव नारायणराव देशमुख, माझोडचे जहागीरदार, रा. शंकरराव, गोविंद देशपांडे, नागोराव हणमंतराव फिंगळीकर, रघुनाथ नरहर बचुवार, गोविंद व्यंकटी महाजन सावकार, बाबा रामचंद्र पत्तिवार, चन्नया मुक्कावार, पापालाल, नागोबा, वंजारी डंन्नी, बापुराव पाटील माजरमकर, रंगनाथराव व दत्तोपंत मांजरमकर वगैरे लहानमोठीं ७५ माणसें आलीं होतीं. पुण्याहून श्रीमती लक्ष्मीबाई जोगळेकर, श्रीमती हरीबाई चोधरी काशीबाई ह्या आल्या होत्या. मुंबईकडील मंडळींत रा. काकासाहेब दीक्षीत,

अण्णासाहेब दाभोळकर ( चिरंजीव व सुनबाईसह ) लक्ष्मण गणेश महाजनी, रघुवीर भास्कर पुरंदरे ( जांवई व मुलांसह ) भडकमकर वकील, डॉ. धीनाथ सीतानाथ अजिंक्य, रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर वकील, केशवराव विष्णू टिल्लु, ( मुलीसह ), रावसाहेब बाळकृष्ण कोळी नाखवा यांचें कुटुंब, बंधुराज पांडुरंग मयेकर, वामन भिकाजी प्रधान, अंधेरी, वांद्रे, कांदवली कडील बळवंत सीताराम देव, वेद्रे मास्तर, हरीश्चंद्र रामजी, विनायक अपाजी वैद्य, कर्णिक, परशरामराव डोळस व त्याचे चिरंजीव, पुरुषोत्तम गोपाळदास घडीआळी, मुकुंदराव आचार्य, रंगनाथ परनेरकर, पुण्याहून बॅरीस्टर अण्णासाहेब गाडगीळ व सौ. लक्ष्मीबाई गाडगीळ, गोपाळ दिनकर जोशी, गोविंद लक्ष्मण पांढरे, खांडव्याहून पुरुषोत्तमराय, अयोध्येचे ब्रह्मचारी जानकीदास, साई खेड्याचे विश्वनाथबोवा, माधवराव अडकर, भुसावळचे वासुदेवराव कोलंगडे सहकुटुंब, मनमाडचे कोलंगडे व रामभाऊ घैसास सहकुटुंब, शिवनाथ चुनीलाल, श्रीपाद रामचंद्र शीर्शीकर सोलापुर, मंगेश मोरेश्वर पाटकर, किसनसा गवई बऱ्हाणपूर, अहमदनगराहून दामुशेट सहकुटुंब ( १० माणसें ) बाळाजी गोविंद ( मुलांसह ) चिंतामण नारायण, सोनटक्के, वामनभाऊ पुजारी, देवळालीचे सखाराम पाटील तासाचे यशवंतराय पाटील अशी ठिकठिकाणची ठळक मंडळी उत्सवाप्रीत्यर्थ आली होती. याशिवाय, कोपरगांवाहून मामलेदारसाहेब, फौजदार साहेब, डॉ. मेहेता, फडणीस सबरजिष्टर वगैरे सरकारी कामगारमंडळी आली होती. बाहेरगांवच्या आलेल्या सर्व मंडळींची सकाळच्या चहा न्याहारीपासून तों रात्रीचें जेवणापर्यंतची व्यवस्था दासगणु महाराजांनीं ठेवली होती.

उत्सवाचे कार्यक्रमाप्रमाणें उत्सवास सुरुवात चैत्र शु. ८मी पासून झाली. नवमीला सकाळीं समाधीवर रुद्राभिषेक झाले. त्याकरितां मुद्दाम वैदिक ब्राह्मण आणविले होते. नंतर पूजा होऊन ११ वाजतां दासगणूमहाराज समाधीपुढें कीर्तनास उभे राहिले. मुंबई बारा वाजेपर्यंत कीर्तन होऊन योग्य वेळीं रामजन्म झाला. व नंतर आरती होऊन दासगणु महाराजांकडून मानकरी सेवेकरी लोकांना वस्त्रें वाटण्यांत आलीं. संध्याकाळीं निशाणांची मिरवणूक निघून निशाणें चढविण्यांत आलीं. रात्रौ संदलीची मिरवणूक निघाली व ती संपल्या

नंतर मैदानात सुंदर दारूकाम सोडण्यात आलें. सर्व समारंभ रात्रीं ३ वाजतां संपला. दुसरे दिवशीं सकाळीं व दुपारीं लहान मोठ्या मल्लाच्या कुस्त्या झाल्या. एकदर सुमारे ४०० कुस्ती झाली. कुस्ती जिंकणारास लहान मोठा पागोटी,' रोख रुपये किंवा चांदीची कडीं ज्याचे त्याचे योग्यते-प्रमाणे देण्यात आली. उत्सवातील हा भाग सर्व तात्या पाटलाकडे आहे. रात्रीं पालखीची मिरवणूक निघाली, व ती संपल्यावर दारूकाम सोडण्यात आले. दोन्हीं दिवसांचे दारूकाम फार प्रेक्षणीय होतें. विनधुराची दारू, त्यातून निघणाऱ्या निरनिराळ्या रंगाच्या निरनिराळ्या आकृति नेत्रांना फार आल्हाद-कारक वाटल्या. हे सर्व दारूकाम दासगणु महाराजाच्या मंडळीपैकीं पापालाल यानीं खास करविले होतें एकंदर रु. २००ची दारू सुटली रामनवमीचे दुसरे दिवशीं दीक्षिताच्या वाड्यांत एका होतकरु कीर्तन काराचे सुंदर कीर्तन झालें. हे कीर्तनकार ह. भ. प. दासगणुबोवांचे शिष्य रा. नागोराव हणमंतराव पिंगळीकर होत. रा. नागोराव मोगलाईतील कोर्टांत कारकुन आहेत. याची कीर्तन पद्धति चटकदार असून प्रासादिक आहे. आपल्या दोन अडीच तासाचे कीर्तनांत त्यांनीं श्रोत्याना तल्लीन करून सोडले.त्यांचे आणखी कीर्तन व्हावे अशी सर्वांची फार इच्छा होती परंतु वेळे-च्या अभावीं तसे होऊं शकलें नाहीं. तिसरे दिवशीं समाधीपुढें गोपाळकाला होऊन उत्सवाचा कार्यक्रम संपला. उत्सवांत रोज सुमारे १२००।१५००पान जेऊन उठत असे. शनिवारीं रात्रीं दासगणु महाराजाचा बालशिष्य तुकाराम गुरू यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.

महाराजांनीं देह ठेवल्यानंतर यात्रेचें स्वरूप साहजिकच संकुचितच झालें होतें तें हल्लीं वाढत्या प्रमाणावर आहे. यंदा दुकानें पुष्कळ आलीं होतीं व जत्रेला जनसमूह चांगला जमला होता.

शिरडींतील सर्व उत्सवांत 'मोठा व मोठ्या खर्चाचा उत्सव' हाच होतो. दासगणुमहाराज आपल्या शिष्य मंडळींच्या सहाय्यानें तो पार

पाडतात हें त्यांना फारच भूषणावह आहे. त्यांच्या हातून असाच हा उत्सव नित्य चालो अशी सद्गुरूचरणापाशीं प्रार्थना करून आम्हीं वाचकांची रजा घेतों.

## श्रीशंकर.

शके १८४७ व इ. स. १९२५ चा श्रीराम नवमीचा उत्सव

श्री सच्चिदानंद-सद्गुरु-भक्त-मानस-राजहंस आधुनिक संतचूडामणी समर्थ श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या पवित्र चरणीं हकीगत सादर करितों ती.

आपल्या श्रीरामनवमीच्या उत्सवास अष्टमीस आरंभ होऊन पौर्णिमेस हनुमान जयंतीनंतर समाप्ती झाली. उत्सवाचे प्रमाण गेल्या वर्षापेक्षां चालू सालीं थोडे अधिक होतें. ह्या सालीं माझा प्रिय शिष्य दामोदर वामन आठवले ह्यास आपण पौष शु॥१०स वैकुंठास श्री हरीच्या जवळ नेऊन ठेविलें हें ठीकच झालें; पण त्याच्या लेंकराबाळांचा सांभाळ करण्याची जबाबदारी म्हातारपणीं माझ्यावर येऊन पडली आहे. तेव्हां या जबाबदारीला आपणाकडून सर्वतोपरी साह्य असावे. तसेंच चिरंजीव दामूचे नांव पंढरीक्षेत्रांत अस्तित्वांत राहावें या सद्धेतूनें दामोदराश्रमांत श्री साईबाबा आर्युनानी वैद्यकालय पंढरपुरच्या लोकांनीं आपल्या मदतीवर उघडले आहे. त्या विद्यालयास रयतेकडून व दयाळू इंग्रज सरकाराकडून योग्य प्रोत्साहन मिळून वैद्यकालय लोकसेवेस उत्तम प्रकारें समर्थ होईल असा आपला आशिर्वाद असावा. वैद्यकाळ्याची चहूंबाजूंनीं कृपाकटाक्षें करून भरभराट करावी. ह्या उत्सवास मुखेड, उंबरी, मांजरम, बीड, हिंगोली, कळमनुरी, आजेगांव, माझोड, म्हैसा, पाथरी, शेलू, अहमदनगर, पुणें, बेळगांव, मिरज, मुंबई, खांडवा, अंधेरी वगैरे ठिकाणाहून लोक आले होते. ज्यांचें येणें झालें नाहीं त्यांनीं उत्सवाच्या

उत्सवाकरितां कांहीं रकमा पाठविल्या. तरी जे स्वत: आपल्या पवित्र चरणापाशीं हजर राहिले व ज्यानीं द्रव्य साह्य केलें त्या सर्व लोकांचें आपण कल्याण करणारे आहातच. उत्सवास गोविंद महाजन चन्नया मुक्काधार यांनीं स्वत: हजर राहून वाण्याच्या सामानावर देखरेख केली. श्रीमंत कृपासागर भवानराव बनसोडे इंदूर व रावसाहेब देव मामलेदार ठाणें हे उत्सवानंतर श्रींच्या दर्शनाकरितां येऊन उत्सवाचा प्रसाद घेतला. जमाखर्चाचा खर्डा या पेटींत ठेविला आहे. त्यांत चुकभूल असल्यास त्याची माफी अज्ञ दासाला असावी. व असेंच सालोसाल ह्या सकल संतांचा चरणरज जो मी दासगणू त्याच्या हस्ते सेवा घेत जावी. आपल्या पवित्र उत्सवांत माझ्या हातून जाणून न जाणून ज्या कांहीं चुका झाल्या असतील त्या चुकांची माफी असावी. अशी माझी नम्र विनंती आपल्या पवित्र चरणापाशीं आहे. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

आपला,

आज्ञांकित सकल संतांचा चरणरज

**दासगणू**

## श्रीसाईनाथ प्रसन्न.

श्री सच्चिदानंदसद्गुरु आधुनिक संतचूडामणी कृपानिधि साईमहाराज संस्थान मौजे शिर्डी तालुके कोपरगांव जि. अहमदनगर यांच्या श्रीरामनवमीच्या वार्षिक उत्सवाचा अहवाल व जमाखर्चाचा तपशील

### जमा

७५ राजेसाहेब माझोडकर
२५ अण्णासाहेब बोऱ्हाळकर
१०१ रघुनाथ बळवुवार उबगीरकर
८० रंगनाथराव व रामराव वरुडकर वकील कळनूरीकर
१११ पापालाल उमरीकर
२६ नागोबा वजारी उमरीकर
११ नारायण उमरीकर
१८ व्यंकोबा रंगारी
१८ बाबा रंगारी उमरीकर
८ रघुनाथ रामचंद्र पत्तेवार
११ गोविंद व्यंकटी महाजन
११ चिन्नय्या व्यंकय्या मुकावार मुखेड
११ बाबा रामचंद्र पत्तेवार मुखेड
९ सीताराम मारवाडी मुखेड
५ चिन्नय्या तांबोळी
२० हरीबाई पाथरीकर चौधरी
१० हरिश्चंद्र रामजी मिस्तरी
१० पिरोजबाई विजयकर मुंबई
५ पिरुबाई रामराव कोठारे
५ जनाबाई शामराव कोठारे
२० लक्ष्मीबाई जोगळेकरीण वहिनीबाई
५ काशीबाई कोल्हटकर
५ अवुताई महाजनी
४ हरीलाल डहाणूकर

### नांवें

२७० रामचंद्र आनदराम मारवाडी सामानाबद्दल रामनवमी
२०॥ रामचंद्र आनदराम मारवाडी हनुमान जयंतीबद्दल सामान
३२८= मुलतानचंद फत्तेचंद मारवाडी साखरभाताबद्दल
२६॥= गोविंद व्यंकटी महाजन हस्ते तांदुळ
१७। रवा
२९८= दुधाबद्दल हस्ते लहानू सोनार
१२॥ पत्रावळी
३०८॥ द्रोण
९॥= एकादशीचें फराळाचें सामान
४७॥ लाडू चहा बरोबर एक प्रत्येकी पांच दिवस मिळून
५॥= सत्रें
११ चिवडा
२ टरबुजें
१४ ब्राह्मण दक्षिणा रामनवमीची
७॥≡ गोरगरिबांस
१३॥ रोजची भोजन दक्षिणा
२० बाबा धर्माधिकारी रामायण वाचण्याबद्दल दहा रुपये रोख आणि एक पगडी सात रुपये गाडीभाडें तीन रुपये मिळून
२६ देवीदास आचारी पंढरपूरकर कामाबद्दल १२ वाटचाली ४ गाडीभाडें १० मिळून

**जमा**

१० रंगनाथ, दत्ता, नरहरी वापूराव पा. रामचंद्र भगवतराव आणि मुखेडकर जोशी

१२८।≈।। अण्णासाो दाभोळकर मार्फत

२ वासुदेव सीताराम

५ श्रीनिवास हरी हळदोणे

५ लक्ष्मीबाई गाडगीळ

५ जी. के गाडगीळ

५ श्रीसाईलीलेच्या वाचकाकडून

१। गोविंद प्रल्हाद

५ रामप्रसाद नरसिंहप्रसाद

२ शामराव नारायण

१० दाजी विठ्ठल सांवारे

५ यमुनाबाई शिवराम

५ पार्वतीबाई गव्हाणकर

५ रा सा. विनायक गणेश देशपांडे

१। गोविंद नारायण दाभोळकर

५ गोविंद नारायण सामंत

२ वासुदेव दत्तात्रय सामंत

१० गोविंद भास्कर चौबळ

२ यशवंत जनार्दन गाळवणकर

२ गंगाधर नारायण चौबळ

१० शांताबाई ब्रह्मांडकर

३ सुलोचनाबाई वाकडे

३ शा भा कंटक

२।। सावळाराम आत्माराम

५ वासुदेव महादेव

१ जनाबाई सीताबाई घटे

२ वासुदेव रामचंद्र शिरसीकर

३। विनायक आप्पाजी वैद्य

३ रामचंद्र वासुदेव घैसास

५ आनंदराव परशराम डोळस

**नांवें**

१२२ शेख महमद अबदुलभाई दारुवाला ११७ व इनाम रुपये ५

१८ हुसेनभाई सयबुभाई वाजेवाला पधरा कामाबद्दल दोन रुपये गाडीभाडे एक रुपया पोटगी

१३ विठोबा सुतार सर्पणाबद्दल

३।।≈ दाजी चितावर अत्तर कोलन वाटर आचाऱ्याकरितां गाडी

५ अनाथ विद्यार्थ्यांकरितां हस्तें दाजी वामन चितावर

२८।०।।। देवाच्या पूजेचा खर्च हस्तें रामचंद्रराव दादा पाटील कोते

६ यात्रा बंदोबस्त

६। सीताराम मारवाडी स्वयंपाकाबद्दल

२ कढईच्या भाड्याबद्दल हस्तें सीताराम

८ प्रसादाचें नारळ

१।।≈ वांगी भाजी

६। बटाटे भाजी

१०८ तुप डबे ३

३।। स्वयपाकास मदतगार हस्तें दाजी वामन चितांवर

५ रुपये तेल गोडें

३ रामनवमीच्या दिवशीं प्रसाद–पेढे

१३। साईमहाराजास गलेफ जरीचें उपरणें

५ आचारी भटजी वगैरे मंडळी त्यांच्या बैलगाडी भाड्याबद्दल

३१ लिंगण्णातवलजी वीस रुपयाचा रुमाल गाडी भाडें ११ रुपये मिळून

जमा

२ सीताबाई रामचंद्र सामंत
२ गोविंद रघुनाथ दाभोळकर
२ पुरुषोत्तम गोपाळदास घडियाळी
१। ना. रा. खडकर
२ विष्णुपंत गोविलकर
२ खंडेराव पाटील
२ रघुवीर भास्कर पुरंदरे

१२८॥

८॥ टपाल वजा जातां

१२८।=॥

२० रावसाहेब गोविंदराव दाभोळकराकडून वीस रुपये मागाहून आले ते जमा
५ विठलराव अजेगांवकर
५ दत्तु पुणतांबेकर
५ श्रीकृष्ण पुरुषोत्तम
५ गणेश पांडुरंग
५ रामचंद्र सीताराम
२ गणपतराव मोरेश्वर
२ नागोराव पिंगळीकर
२ एम् केळकर
२ यशवंत राजाराम जुन्नरकर
१० कृष्णराव नारायणराव मालदिवकर
५ रावबहादुर गोविंदराव मंडलोई
१॥= बाजीराव पांडुरंग मंडलोई
२ कृष्णराव रामकृष्ण
५ कृष्णाबाई तालचेरकर
७ वासुदेव काशीनाथ गांधी गुळाची ढेप एक
७ शिवराम सोपाना गुळाची ढेप एक

नांवें

३१ किसनराव आबाजी कासार एक रेशमी शमला व गाडीभाडे सहा रुपये
४ मांडव जागेबद्दल
३ काथ्या, सुतळी सोया दाभण वगैरे सामान हरतें रघु शिंदे
११ बळी काशिराम शिंपी चोपदार धोतर १ किंमत अकरा रुपये
११ नाना कुलकर्णी पुजारी चोपदार धोतर एक
८ नट्या अप्पा शिंदे चोपदार उपरणें एक
५ मार्तंड म्हाळसापती भगत उपरणें १
५ साहिलाजी उपरणे १
५ यादव रघु शिंदे पालखीवाला
५ अप्पा बहिरू पालखीवाला उपरणें १
५ बयाजी पाराजी पालखीवाला उपरणें १
५ रामा रंभाजी
२।= दादाभाई ताशेवाला पागोटें १
६ अब्दुलभाई मुजावर कफनी १ शिलाई कपडासुद्धां सहा रुपये
५॥।= मरेबांकरितां सदरे ३
१।= विड्याचीं पानें सुपारी चुना कात वगैरे
९ बाब्या पिलाजी गुरव वाजत्री
१। सगुण मेरु नाईक
६८= रामदासीबुवा डोमगांवकर महाराज उपरणें १ रोख दक्षिणा एक रुपया नारळ १;८= मिळुन सहा रुपये दोन आणे

| जमा | नांवें |
|---|---|
| ४६ महाराजांच्या पुढे ज्यांची नामावळी माहित नाही अशी मिळालेली रक्कम | १ बाबुभट संगमनेरकर |
| ६। दामुशेट कासार नगरकर तांदुळ पांच पायली | ३८≋ मथु न्हावी चिमण्या वगैरे लावण्याबद्दल एक रुपया रोख आणि दोन रुपये तीन आणे |
| ११ धोंडोपंत वकील नांदेडकर | ४॥≋ श्रीविठल मंदिरास उपरणे घेतली हस्ते बापाजी लक्ष्मण |
| २५ भवानरावजी बनसोडे इंदूर | ३।॥ अनाजी कुंभार १॥रुपया रोख आणि पागोटे सव्वा दोन रुपये |
| २५ श्रीमंत सरकार बुळे | ४।॥ पुजा कोळी भांडे घासण्याबद्दल अडीच रुपये आणखी एक पागोटें सव्वा दोन रुपये |
| ११ बाळासाहेब रेंगे खांडवा | १ कोंडाजी शेळके गडी २ दिवस दररोज -।।- |
| ३ जगन्नाथराव | १॥ मल्हारी परीट पाणी तापविणारा समाधी कडील दीड रुपया |
| १० रघुवीर भास्कर पुरंदरे | १।~ डाळतांदुळ निसणार मोलकरीण दिवस ७ दररोज ८≋ |
| ९८०।.॥ | २८ गुळाच्या ढेपा चार शिऱ्या करितां |
| १६०।~॥।· | ६।≋ सरूबाई मोलकरीण |
| कमी पडलेली रक्कम दासगणू महाराजानी आपले नांवे जमा केले एकशें साठ रुपये पावणे सहा आणे. | १।॥= बाजेवाल्याचा भोजन खर्च |
| ११४०॥=।- | ११४०॥=। |

टीप ३०० तात्याबा पाटील कोते यांच्या सांगण्यावरून तमाशे हंगामेबद्दल खर्च निराळा तीनशे रुपये.

अभिप्रायः—श्री गुरुगोविंदमहाराज यांचे चरित्र ( लेखक व प्रकाशक डॉ. प्रल्हाद विष्णु काळे एल. सी. पी. अँड एस्, नासीक. किंमत एक रुपया ) खानदेशात आनंदवन सोनगीर, येथे श्री गुरुगोविंदमहाराजांचें वास्तव्य होतें. शके १८४२ ज्येष्ठ वद्य षष्ठीला त्यानीं समाधि घेतली. त्यांच्या व श्री साईनाथ महाराजांच्या चारित्र्यांत बरेच साम्य दिसून येते. जसा श्री साईनाथ महाराजांचा पूर्व इतिहास उपलब्ध नाही तसा त्यांचाही नाहीं. ज्या वेळीं श्री साईनाथ महाराज शिरडीस प्रगट झाले त्याच सुमारास ते सोनगीर येथें प्रगट झाले असे दिसते. महाराजाचे बोलण्यांत मोगलाईतील गांवांचा उल्लेख येत असे. त्यावरून महाराज मोंगलाईकडील असावे असें आपण मानतो त्याप्रमाणें त्यांच्याही बोलण्यात अमृतसर जवळील गावांचा उल्लेख येत असे त्यावरून हे पंजाबकडील असावेत असे त्यांचे भक्त मानीत असत. महाराजाप्रमाणें त्यांचीही धुनी असे व उदीप्रमाणें त्या धुनींतील विभूति ते लोकांना लावीत असत. महाराजांच्याप्रमाणें त्यांचेपाशीं एक दंडा असे व तो ते-कित्येकवेळां सटक्या प्रमाणे जमिनीवर आपटीत असत. काहीं प्रसंगीं दंडयाचा लोकांना प्रसादही देत असत अशा प्रसंगीं अनिवार क्रोधाचा आविर्भाव आणून शिव्याही देत असत. जाण्याची परवानगी देणें, दर्शनास आलेल्या मनुष्याच्या मनांतील भावाचे उत्तर देणें, खिशांत असलेले नेमके पैसे सांगून ते मागून घेणे, आपले ठिकाण न सोडतां सोनगिरच्या बाहेर भक्तांना दर्शन देणे, गुरूपदेश न देणें ज्याची जी उपासना असेल तीच त्याची दृढ करणें वगैरे बऱ्याच गोष्टी अशा तऱ्हेच्या होत्या.

श्री साईनाथ महाराजानीं देह ठेविला त्या वेळची सोनगीर येथें घडलेली हकीकत ह्या चरित्रांत दिली आहे ती अशी. त्या सुमारास श्री गुरू गोविंद महाराज बरेच आजारी होऊन अंगांत जोराचा ताप भरला व जवळील भक्त मंडळी चिंताक्रांत झाली. महाराज यांतच समाधिस्थ होणार अशा भावनांच्या काहुराने ते फारच गोंधळून गेले. त्यांची सर्वांची

अशी वृत्ति पाहून स्वतः श्री गुरू गोविंद महाराज इतका ताप अंगात असता म्हणाले, "तीन महात्मे है, एक ज्योती चंद्रमे मील जायेगी, बजरंग हमकू कहता है कि तुम हा रहो" महाराजाच्या या आश्वासनामुळे मंडळीस धीर आला व बाकीचे महात्मे कोठें आहेत म्हणून त्यांपैकीं एकाने विचारले तेव्हां आपण शिरडीचे श्री साईबाबा महाराज यांचेबद्दल उद्गार काढीत आहोंत असे त्यांनीं दर्शविलें. दसऱ्याचे दिवशीं (श्रीसाईबाबांनीं देह ठेविला तो दिवस) दिवसा सुमारे तीन वाजता त्यांनीं एका सेवेकऱ्यास "म्हाके आव" अशी आज्ञा केली व त्यास आपले दंडयावर ओंजळीने पाणी ओतण्यास सांगितले व म्हणाले "चंद्रमें ज्योति मिल गई," या गोष्टी वरून संतांचे आपआपसांत बिनविद्युत संदेश कसे चालू असतात याची थोडी कल्पना येते. शेगांवचे श्रीगजानन महाराजांनीं समाधि घेतली त्या दिवशीं शिरडीस श्री साईमहाराजानीं अशीच त्यांची जाणीव केली होती. महाराजानीं स्नान करून एक सत्पुरुष समाधिस्थ झाल्याचे उद्गार काढले, व ते सत्पुरुष श्रीगजाननमहाराज असें पुढें वर्तमानपत्रावरून कळले.

डॉ. काळे यांनीं हें चरित्र लिहून अशा धर्तीच्या मराठी वाङ्मयामध्ये चांगली भर घातली आहे. सत्पुरुषांचीं चरित्रे आधींच हृदयंगम असतात; त्यात लेखक स्वतः स्वानुभवी व प्रेमळ भक्त असल्यामुळें हे चरित्र जास्ती मनोवेधक झालें आहे. विषयाची जुळवाजुळव व मांडणी फार चांगली केली आहे. भाषा विषयाला साजेलशी प्रौढ व प्रेमळ आहे. श्रद्धाळु मुमुक्षूने हें चरित्र एकदां अवश्य वाचावें, अशी आम्हीं शिफारस करितो.

## चोपाई

By Mr. Vaman Patel B. A. LL B.

जिव्हा रट तूं साई नाम । तारे शुं छे बीजुं काम ॥
बकवा करवा छोडी दे । वखत तुर्त एटले मळे ॥
कान सांभळ एकज फकत । शब्दे शब्दे सांइ नाम ॥
नहीं जो आंख तूं बीजूं कांई । सांइसमर्थ विण जग मांहि ॥
छोडी तर्क वितर्को बहु । सांई स्वरूप मन स्मर तूं ॥
अवर्णनीय ते क्यम वर्णु । अजरामर तेने शुं करुं ॥
विरमुं तेथी वंदी सांई । स्वरूप सच्चिदानंदनुं कही ॥

Unborn Immortal Thou
Invisibly visible Guru,
To free thy devotees dear
Incorporeal formless tho
Confined became to form and name.
Once that robuqsʌ as
Thinning now, But
Infinite same Thine Heart,
This Sain Nath, Baba Sain
As suits the namer's fancy.
Bow to thee Thou Nameless
Countless times, Prana's
Motions passing ever reach.

This Dwait, no more
Shall Adwaitists say
Without doubt right
Still this the step
Advaitist dear

To reach thine goal
The same as mine

Long this feud did rage
But calmed now the
Troubled waters, sipping
Experience Nectar-like
Drops alas! of ocean wide
Still drops of certain truth
Assuring of the pointed path
Foreboding future bright
From such sin above afar
Keep Thy Ramu * Ramu Thine
Thine I am and wish to be
But linger still a moment
Thinking of my worthlessness
In mating this my wretched self
With Thee O Sain Thou sinless Pure.

Forgetting would be now a sin
O sinless Thou
My Beacon light and god Sakshat ( साक्षात )
Enlighten every step of mine.

This night in Dreamland
Did Thy Ramu wander
Long over streets and forests
For nectar, words and Darshan thine

At last Thee contemplating found
Unseen in a nook forlorn

* Baba used to call the composer by this name.

The Darshan had and wanted chat
So waited long but
Thy lips were sealed
बोलत कां नाहीं
बाबा Did I say
Replaying didst Thou say†.
मी आतां बोलायचा नाहीं
मी तुला सोडलें
But a hard nut this reply
For Ramu's brainless Ken
He therefore only prays
Don't give him up
For orphan would he be
If Thou abandon him
This prayer mine Sainath
Receive thou on the day of Dutt

† This composition was sent to Babâ on Datta Jayanti Day

## पद.

शुष्क हृदय म्हारुं, हंमेशनुं नही भीनुं
कदी कदी प्रेम सरिता सूकी, लहरी भरती ओट चालू
आ दुष्ट हृदय म्हारुं।

हृदय लवण गळी प्रेमसरिते, निर्मळ जळ हंमेश वहे
शांत थइ तद्रूप बनुं हुं, हुंपण त्यारे क्यांथी रहे
हृदय एवुं ते क्यारे थशे ?

भेदाभेद वळी स्थूळ सूक्ष्म तो आपोआप खरी पडशे
त्यारे वामनडा तूं भळशे सांइस्वरूपमां निश्चे
हृदय खरूं त्यारे भिनशे

## प्रभात.

जागीये ब्रह्मवीर त्यजी निद्रा घोर तुज
भूली शारीरी प्रपंच, स्मर हवे तूं कोण हो
तूं नही आ दृश्य शरीर, दृश्य किमपि तुं नथी
सूक्ष्म शरीरनी ए कृति, न्हानो तूं एवो नही
चराचर दृश्य अखिल, देख स्वतः सिद्ध तूं
जूठुं सर्व दृश्य भूली, चित्तमां जड एक तूं
स्मरी सांइदत्त मंत्र, देही तुं विदेही रहे
स्वरूप तुज सांइनुं ए, मूक वदने स्मर हवे

## प्रभात

धूळ धूळ धूळ धूळ; सांईविण सर्व धूळ ॥ ध्रु ॥

जर जोरु जमीन धूळ, पुत्र परिवार धूळ ॥ १ ॥

प्राणप्रिय मित्र धूळ, मानापमान कीर्ति धूळ
जनक जननी एक सत्य, गुरुवर मम सांईनाथ ॥ २ ॥

चळ नक्षत्रे जन्मी जर, नाची नचावे बहु छंद
वश थतां रुपे एना, बने रिपु भाइबंध ॥ ३ ॥

चावींगी ए रमाबाई छे क्रूर भक्तमति
रही दुष्टा दूर उभी, जकडावे साथी बंधथी ॥ ४ ॥

साई म्हारो छे दयाळ, भक्त कोड पूरनार
शत्रु मित्र रहित नित्य, भाविक जन तारनार ॥ ५ ॥

पत्नी पुत्र मानापमान, जाय तूर्त जतां भान
सांइ दत्त आशीर्वचन, रटतां साई आवे साथ ॥ ६ ॥

धूळीओ मांगे तेथी भीख, कहाडो झाडी एनी धूळ
वसीने चित्ते अखंड, नृपवरा ओ सांइनाथ
सांइ सांइ सत्य—सत्य एक सांइरे ॥ ७ ॥

## अध्याय २९ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

गताध्यायीं जाहलें कथन । त्याहून या अध्यायीं श्रवण ॥
करवितों श्रीचें अतर्क्य विंदान । कथानुसंधान एकची ॥ १ ॥

ऐकून बाबांची अगाध लीला । इसवी सन एकूणीसशें सोळा ॥
ते वर्षीं एक भजनी मेळा । शिरडीसे आला दर्शनार्थ ॥ २ ॥

मंडळीही सर्व प्रवासी । कीर्ती परिसिली मंद्रदेशीं[१] ॥
जात असतां काशीयात्रेसी । वाटेंत शिरडीसीं उतरली ॥ ३ ॥

साईबाबा महासंत । धीर उदार आणि दांत ॥
यात्रेकरूंसी कृपावंत । पैसे अत्यंत वाटिती ॥ ४ ॥

दिडक्या चवल्या हाताचा कीस । अधेल्या पावल्यांचा पाऊस ॥
रुपये दहा कोणास वीस । कोणास पन्नास ते देत ॥ ५ ॥

हें काय सणासूदादिसीं । कार्य विशेषीं का पर्वकाळासीं ॥
प्रतिदिवसीं उक्त प्रमाणेंसी । संतोषेंसीं अर्पीत ॥ ६ ॥

पहूड येती भवय्ये नाचती । गवय्ये गाती भाट वानिती ॥
तमासगीर मुजरे देती । भजनीं रंगती हरिभक्त ॥ ७ ॥

---

१ मद्रास इलाख्यांत.

ऐसे महाराज उदारवृत्ती । दानधर्मी सढळ स्थिती ॥
ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति । इच्छा धरिती दर्शनाची ॥ ८ ॥

कधीं आलिया बाबांचे चित्तीं । पांथस्थांतेंही पैसे वाटिती ।
दीना दुबळ्यांचा परामर्ष घेती । कृपामूर्ति साईनाथ ॥ ९ ॥

पुरूष एक बाया तीन । मेळा अवघा चौघांमिळून ॥
मेहुणी स्वस्त्री दुहिता आपण । संतदर्शन कामुक ॥ १० ॥

घेऊनि साईचें दर्शन । मंडळी पावली समाधान ॥
करीत साईपाशीं अनुदीन । प्रेमळ भजन नेमानें ॥ ११ ॥

सांप्रदाय रामदासी । भजन करीत अति उल्हासीं ॥
बावाही रुपया आठ आणे तयांसी । आलिया मनासी अर्पीत ॥१२॥

कधीं तयांस वर्फी देत । कधीं परतवीत रिक्तहस्त ॥
बाबांचें हें ऐसें सदोदित । परी न निश्चित कांहींही ॥ १३ ॥

पैसे वाटीत हें तो सत्य । नव्हतें यांत कांहींही असत्य ॥
परी ते नव्हते सर्वांस देत । ठावें न मनोगत कवणातें ॥ १४ ॥

फकीर फुकरे भिक्षेकरी । सदैव येत बाबांचे द्वारीं ॥
बाबा जरी दयाळू भारी । धर्म न करीत सर्वांतें ॥ १५ ॥

जयाची लाभ काळाची घडी । तयासींचही सुखपरवडी ॥
संत हस्तस्पर्शाची कवडी । लाभेल जोडी भाग्याची ॥ १६ ॥

ये अर्थीची एक गोष्ट । ऐकतां श्रोते होतील संतुष्ट ॥
करूनि तयांपुढें ती प्रविष्ट । धरूं मग वाट पुढील ॥ १७ ॥

होऊन प्रातःकाळची न्याहारी । बैसतां बाबा स्तंभाशेजारीं ॥
धुनी संन्निध मशीदीमाझारीं । येतसे पोरी अमनी तैं ॥ १८ ॥

---

१ श्रीचा एक भक्त कोंडाजी याची मुलगी.

पोरी तीन वर्षाची नागडी । हातीं जिनतानी डबी उघडी ॥
आई, जमालसह तांतडीं । येतसे ती घडी साधूनि ॥ १९ ॥

अमनी बैसे मांडीवरी । डबी देई बाबांचे करीं ॥
'बाबा रुपय्या रुपय्या' करी । हात धरी बाबांचा ॥ २० ॥

बाबांस मुलांचें वेड भारी । पोरही होती गोंडस साजिरी ॥
मुके घेत कुरवाळित करीं । पोरीस धरीत पोटाशीं ॥ २१ ॥

बाबांनीं धरावें पोटाशीं । अमनीचें चित्त रुपयापाशीं ॥
'बाबा देना देना मजशीं' । म्हणे खिशाशीं लक्ष सारें ॥ २२ ॥

अमनीचा तो पोर स्वभाव । थोरामोठ्यांही तीच हांव ॥
स्वार्थासाठींच धांवा धांव । परमार्थीं भाव एकाद्या ॥ २३ ॥

पोरीनें बसावें मांडीवरी । आईनें दूर कटड्या बाहेरी ॥
हालं नको देत-तोंवरी ॥ खुणावी पोरीस दूरुनि ॥ २४ ॥

'तुझ्या बापाचें मी काय लागें । उठली ती सुटली माझ्या मागें' ॥
फुकट खाऊ मेले निलागे[1] । म्हणावे रागें बाबांनीं ॥ २५ ॥

परी हा राग बाह्यात्कारीं । अंतरीं प्रेमाच्या उसळती लहरी ॥
हस्त घालूनि खिशाभितरीं । रुपया बाहेरी काढावा ॥ २६ ॥

घालूनियां तो डबींत घट्ट । झांकिता आवाज होई जों खट्ट ॥
डबी हातीं पडतां ती झट्ट । घराची वाट धरीतसे ॥ २७ ॥

हें तों होई न्याहारी वक्तीं । तैसेंच जंव ते लेंडीवर निघती ॥
तेव्हां ही अमनीस रुपय्या देती । रागें भरती तैसेंची ॥ २८ ॥

ऐसे प्रतिदिनीं दोन तिजला । सहा देत त्या जमलीला[2] ॥
पांच दादा केळकरांला । भाग्या सुंदरीला दोन दोन ॥ २९ ॥

---

१ निफट. २ कोंडाजीचे बायकोस.

दहा ते पंधरा तात्याबांसी । पंधरा ते पन्नास फकीर बाबांसी ॥
आठ वाटिती गोरगरिबांसी । नित्य नेमेसीं हें देणें ॥ ३० ॥

असो ऐसी ही दानशीलता । मद्रासियांनीं ऐकोनि वार्ता ॥
सहज उपजोनि अर्थस्वार्थता । भजनोपक्रमता मांडिली ॥ ३१ ॥

बाह्यतः ते भजन सुंदर । अंतरीं द्रव्याचा लोभ दुर्धर ॥
पैसे देतात या आशेवर । राहिले सपरिवार शिरडींत ॥ ३२ ॥

त्यांतून तिघांस मोठी हाव । बाबांनीं द्यावे बहुत द्रव्य ॥
परी साईपदीं भजन सद्भाव । हा एक निजभाव स्त्रियेचा ॥ ३३ ॥

पाहूनिबा मेघासमोर । आनंदें एक नाचेल मोर ॥
चंद्रालागीं जैसा चकोर । तैसाच आदर तियेचा ॥ ३४ ॥

एकदां माध्यान्हीची आरती । चालतां साई कृपामूर्ति ॥
पाहूनि बाईची सद्भाव स्थिति । दर्शन देती रामरूपें ॥ ३५ ॥

इतरांस नित्याचे साईनाथ । बाईच्या दृष्टीस जानकीकांत ॥
डोळां घळघळ अश्रू स्रवत । पाहोनि विस्मित जन झाले ॥ ३६ ॥

दोहीं हातीं वाजवी टाळी । सर्वेच नयनीं आसुवें ढाळी ॥
देखून हें अपूर्व ते वेळीं । जाहली मंडळी विस्मित ॥ ३७ ॥

ऐसा पाहोनि तो देखावा । जिज्ञासा जाहली सकळांचे जीवा ॥
इतुका प्रेमाचा पूर कां लोटावा । आनंद व्हावा तियेसची कां ॥३८॥

पुढें स्वपतीस तिसरे प्रहरीं । आपण होऊन आनंद निर्भरीं ॥
रामदर्शन नवल परी । वदे आचरित साईचें ॥ ३९ ॥

नीलोत्पलदलश्याम । भक्तकाम कल्पद्रुम ॥
तो हा भरताग्रज सीताभिराम । दाशरथी राम मज दिसला ॥ ४० ॥

किरीटकुंडलमंडित । वनमाला विराजित ॥
पीतवास चतुर्हस्त । जानकीनाथ मज दिसला ॥ ४१ ॥

शंखचक्र गदाधर । श्रीवत्सलांछन कौस्तुभहार ॥
तो हा पुरुषोत्तम परात्पर । रूप मनोहर देखिला ॥ ४२ ॥
म्हणे हा मानव रूपधारी । असामान्य लीलावतारी ॥
जानकीजीवनमनोहारी । धनुर्धारी मज दिसला ॥ ४३ ॥
फकीर दिसो हा बाह्यात्कारीं । भिक्षाहि मागो दारोदारीं ॥
जानकीजीवन मनोहारी । धनुर्धारी मज दिसला ॥ ४४ ॥
असो हा अवलिया उपराउपरीं । कोणास कैसाही दिसो अंतरीं ॥
जानकीजीवन मनोहारी । धनुर्धारी मज दिसला ॥ ४५ ॥
बाई मोठी परम भावार्थी । पति तियेचा अत्यंत स्वार्थी ॥
ऐसीच भोळी स्त्रियांची जाती । कैचा रघुपती ये स्थळीं ? ॥ ४६ ॥
मनीं वसे जैसें जैसें । भोळ्या भाविकां आभासे तैसें ॥
आम्हा सकळां साई दिसे । हिलाच कैसें रामरूप ॥ ४७ ॥
ऐसे कुतर्क करूनि नाना । केली तियेची अवहेलना ॥
विषाद नाहीं बाईच्या मना । असत्य कल्पना ती नेणें ॥ ४८ ॥
ती पूर्वीं मोठी अधिकारी । असी तियेची आख्या भारी ॥
होतसे रामदर्शन सुखकारी । प्रहरो प्रहरीं तियेस ॥ ४९ ॥
पुढें जाहला द्रव्य लोभोद्भव । द्रव्यापाशीं नाहीं देव ॥
जाहला रामदर्शनीं अभाव । ऐसा हा स्वभाव लोभाचा ॥ ५० ॥
साईस हें तो सर्व अवगत । जाणूनि तिचें सरलें दुरित ॥
पुनरपि रामदर्शन देत । पुरवीत हेत तियेचा ॥ ५१ ॥
असो पुढें तेच रात्रीं । कैसी वर्तली नवल परी ॥
गृहस्थ देखे निद्रेमाझारीं । स्वप्न भारी भयंकर ॥ ५२ ॥
आपण आहोंत एका शहरीं । पोलीस एक आपणा घरीं ॥
मुसक्या बांधून आवळी करकरी । टोकें निजकरीं मागें उभा ॥ ५३ ॥

तेथेंच एक पिंजरा ते जागीं । निकट तयाचिया बाह्यभागीं ॥
साई ही सर्व पहावयालागीं । उभेच कीं उगी निश्चळ ॥ ५४ ॥
पाहूनि महाराज संनिधानीं । जोडूनियां दोनी पाणी ॥
करोनियां मुख केविलवाणी । दीन वाणी तव वदे ॥ ५५ ॥
बाबा आपुली कीर्ती ऐकूनि । पातलों असतां अपुले चरणीं ॥
प्रसंग हा का आम्हालागुनी । तुम्हीही असूनि प्रत्यक्ष ॥ ५६ ॥
महाराजीं प्रत्युत्तर दिधलें । कृतकर्म अवघें पाहिजे भोगिलें ॥
गृहस्थ अति विनीत बोले । कांहीं न केलें ऐसें म्यां ॥ ५७ ॥
या जन्मीं तरी कांहीं न केलें । जेणें हें ऐसें संकट गुजरलें ॥
तयावरी महाराज बोलले । असेल केलें जन्मांतरीं ॥ ५८ ॥
दिधलें मग प्रत्युत्तर तेणें । मागील जन्माचें मी काय जाणें ॥
असलें तरी तें अपुलें दर्शनें । भस्म होणें आवश्यक ॥ ५९ ॥
होतां अम्हां अपुलें दर्शन । अग्निपुढें जैसें तृण ॥
तैसें तें समूळ भस्म होऊन । कैसा न त्यापासून मुक्त मी ॥ ६० ॥
तंव महाराज वदती तयास । ऐसा तरी आहे का विश्वास ॥
होय म्हणतां गृहस्थास । डोळे मिटावयास आज्ञापिती ॥ ६१ ॥
आज्ञेप्रमाणें डोळे मिटूनी । उभाच आहे तंव तत्क्षणीं ॥
धाडदिशीं जैसें पडलें कोणी । आवाज श्रवणीं ऐकिला ॥ ६२ ॥
आवाज कानीं पडतां दचकला । डोळे उघडूनि पाहूं लागला ॥
आपण बंधनिर्मुक्त दिसला । पोलिस पडला रक्तबंबाळ ॥ ६३ ॥
तेणें मनीं अत्यंत घाबरला । महाराजांकडे पाहूं लागला ॥
हांसून मग ते म्हणती तयाला । 'भला सांपडलास तूं आतां' ॥ ६४ ॥
आतां येतील अमलदार । पाहून येथील सर्व प्रकार ॥
तूंच दांडगा म्हणतील अनिवार । पुनः गिरफतार करतील[1] ॥ ६५ ॥

---

१ पकडतील.

मग तो गृहस्थ वदे तत्वतां । बाबा आपण खरेंच बोलतां ।
कसेंही करा सोडवा आतां । दिसेना त्राता तुम्हाविण ॥ ६६ ॥
ऐसें ऐकूनि साई वदती । पुनश्च लावी नेत्रपातीं ॥
तैसें करुनि डोळे जों उघडिती । नवल स्थिति आणीक ॥ ६७ ॥
आपण पिंजऱ्याचे बाह्यदेशीं । महाराज साई अपलेपाशीं ॥
घातलें साष्टांग नमन त्यांसीं । बाबा मग पुसती तयातें ॥ ६८ ॥
आतांचा तुझा नमस्कार । आणी या पूर्वीं जे घालीस[1] निरंतर ॥
आहे काय या दोहींत अंतर । करून विचार सांगे मज ॥ ६९ ॥
तंव तो गृहस्थ देई उत्तर । जमीन अस्मानाचें अंतर ॥
केवळ द्रव्यार्थ पूर्व नमस्कार । सांप्रत परमेश्वरभावानें ॥ ७० ॥
पूर्वीं कांहींही भाव नव्हता । इतकेंच नव्हे मुसलमान असतां ॥
आपण आम्हा हिंदूस भ्रष्टवितां । होता चित्ता हा रोष ॥ ७१ ॥
तयावरी बाबा पुसती । नाहीं काय तुझिया चित्तीं ॥
मुसलमानाच्या देवांची भक्ति । नाहीं म्हणती गृहस्थ ॥ ७२ ॥
पुसती बाबा तयालागुनी । पंजा नाहीं का तुझिया सदनीं ॥
पूजीत नाहींस का ताबुताचे दिनीं । पाही मनी विचारूनी ॥ ७३ ॥
'काडे बिबी'ही आहे सदनीं । लग्न कार्यासी तिजला पूजुनी ॥
तुष्टवितोसना मानपानीं । मुसलमानी दैवत[2] हें ॥ ७४ ॥
होय म्हणूनी मान्य करितां । आणीक काय इच्छा पुसतां ॥
निजगुरु रामदास दर्शनता[3] । उपजली आस्था गृहस्था ॥ ७५ ॥
महाराज मग तयाप्रती । मार्गे वळून पहा म्हणती ॥
मग जों मार्गे वळून पाहती । समर्थ मूर्ति[4] सन्मुख ॥ ७६ ॥

---

१ घालीत असेस. २ नांवाचें दैवत. ३ दर्शनाची इच्छा ४ समर्थ-रामदास.

पडतांच समर्थाचे पायीं । अदृश्य जाहले ठाईंचे ठायीं ॥
मग तो जिज्ञासापूर्वक पाहीं । आणीक कांहीं विचारी ॥ ७७ ॥
बाबा अपुलें जाहलें वय । म्हातारा हा दिसतो काय[1] ॥
आहे आपणा ठावा काय । आयुर्दाय[2] आपला ॥ ७८ ॥
काय वदसी मी म्हातारा आहे । माझिया सवें धांऊनि पाहें ॥
म्हणोन साई जों धावताहे । हा लागलाहे माघारा ॥ ७९ ॥
महाराज सवेग धांवता । धुळोरा जो उसळला वरता ॥
तेच संधीस पावले अदृश्यता । पावली जागृतता गृहस्थास ॥ ८० ॥
असो तो जें लाधला जागृती । मनीं विचारिता स्वप्नस्थिती ॥
तात्काळ पालटली चित्तवृत्ती । वानी महती बाबांची ॥ ८१ ॥
पाहूनि ऐसी चमत्कृती । साईपदीं जडली भक्ति ॥
बाबांविषयीं संशयवृत्ती । मावळली परिस्थिती पूर्वील ॥ ८२ ॥
पाहूं जातां अवघें स्वप्न । परी तीं उत्तरें आणि ते प्रश्न ॥
ऐकूनि श्रोतां करावा ग्रहण । भावार्थ गहन आंतील ॥ ८३ ॥
हा प्रश्नोत्तर अनुवाद । मद्रासी पावला परम बोध ॥
विराला साईसंबंधीं विरोध । हास्य विनोद रूपानें ॥ ८४ ॥
दुसरे दिवशीं प्रातःकाळीं । मंडळी मशीदीं दर्शना आली ॥
दोन रुपयांची बर्फी दिधली । कृपा केली साईनाथें ॥ ८५ ॥
वैसेच पदरचे रुपये दोन । बाबांनी तयां समस्तां देऊन ॥
घेतलें कांहीं दिवस ठेवून । भजन पूजन चाललें ॥ ८६ ॥
पुढें कांहीं काळ क्रमिला । निघाली मंडळी जाण्याला ॥
नाहीं जरी बहु पैसा लाधला । भरपूर लाभला आशिर्वाद ॥ ८७ ॥
अल्ला मालीक बहोत देगा । अल्ला तुम्हारा अच्छा करेंगा ॥
पुढें हॅच की आलें उपेगा[3] । लागले मार्गा ते जेव्हां ॥ ८८ ॥

१ शरीर. २ आयुष्याची मर्यादा. ३ उपयोगा.

साईंचिया आशिर्वचनीं । साईची आठव ध्यानीं मनीं ॥
मार्ग चालतां दिवस रजनी । दुःख ना स्वप्नीं तिळभरी ॥ ८९ ॥
घडली आशिर्वादानुरूप । यथासांग यात्रा अमूप ॥
वाटेस न होतां यत्किंचित ताप । पातले सुखरूप निजगृहा ॥ ९० ॥
मनीं चिंतिल्या होत्या एका । त्या घडून घडल्या यात्रा अनेका ॥
वानीत साईवचन कौतुका । आनंद सकळिकां अनुपम ॥ ९१ ॥
शिवाय संताचें आशिर्वचन । अल्ला अच्छा करील हें वचन ॥
अक्षरें अक्षर सत्य होऊन । मनोरथ पूर्ण जाहला ॥ ९२ ॥
ऐसे ते समस्त तीर्थोपासक । भगवद्भक्त मद्रासी लोक ॥
सकळ सत्वस्थ सात्वीक । बंधमोचक साई त्यां ॥ ९३ ॥
ऐसीच सुरस आणीक कथा । सांगतों परिसिजे सादर श्रोतां ॥
भक्तिभावें श्रवण करितां । आश्चर्य चित्ता प्रगटेल ॥ ९४ ॥
भक्तकाजकल्पद्रुम । कैसे साई दयाळू परम ॥
कैसे सप्रेम भक्ताचे काम । पुरवीत अविश्रम सर्वदा ॥ ९५ ॥
ठाणे जिल्ह्यांत वांद्रे शहर । तत्रस्थ एक भक्तप्रवर ॥
रघुनाथराव तेंडूलकर । चतुरधीर बहुश्रुत ॥ ९६ ॥
सदा आनंदी मोठे प्रेमी । विनटले साईचें पादपद्मीं ॥
तेथील बोध मकरंदकामी । अखंड नामीं गुणगुणत ॥ ९७ ॥
रूप देऊनि 'भजनमाला ।' वर्णिली जयांनीं साईलीला ॥
ती भक्ति प्रेमें वाचील त्याला । साईच पावला पावलीं[१] ॥ ९८ ॥
सावित्री नामें तयांचें कलत्र । बाबू तयांचा ज्येष्ठ पुत्र ॥
पहा तयांचा अनुभव विचित्र । परिसा तें चरित्र साईचें ॥ ९९ ॥
एकदां बाबू साशंकितमन । वैद्यकीय पाठशाळेमधून ॥
घेऊन परदेशीय वैद्यकी शिक्षण । परिक्षेलागून बैसेना ॥ १०० ॥

---

१ पदोपदीं.